ePaper
# शिंदे गटाकडून शिवसेनेचा 'दसरा मेळावा' हायजॅक करण्याच्या तयारी




| वर्ष - 6 | अंक - 140 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- 'केटीईएस'मध्ये पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी गुजराथी
- भूखंड विक्रीला विरोध!
- कोकणवासी प्रवाशांच्यामदतीला आ. लांडगे धावले!

www.mahaenews.com | शनिवार | दिनांक 27 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडकरांची मान उंचावली!

## स्मार्ट सिटीला आणखी तीन पुरस्कार : राजेश पाटील यांचाही गौरव

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, स्मार्ट सिटीज कौन्सिल इंडियाच्या वतीने आयोजित "७ व्या स्मार्ट शहरीकरण २०२२" प्रदर्शनात पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीला सर्वाधित तीन "स्मार्ट एनर्जी, नागरी सहभाग आणि मोस्ट पॉप्युलर लीडरशिप" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**



सहारा स्टार, मुंबई येथे २६ रोजी स्मार्ट सिटी कौन्सिल इंडियाचे संस्थापक व कार्यकारी संचालक श्री. प्रताप पडोडे, महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिव श्रीम. सोनिया सेठी, एलव्हीएक्स ग्लोबलचे संस्थापक अध्यक्ष श्री. कोरी ग्रे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महानगरपालिका आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंग यांच्यासह सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, कंपनी सेक्रेटरी चित्रा पंवार यांनी पुरस्कारांचा स्विकार केला. यावेळी, स्मार्ट सिटीचे सल्लागार प्रतिनिधी उपस्थित होते. स्मार्ट सिटी कौन्सिल इंडियाला ७ वर्ष पूर्ण झाल्याने वॉशिंग्टन डीसी आणि ऑस्ट्रेलिया यांच्या सहकार्याने "७ व्या स्मार्ट शहरीकरण २०२२" भारताच्या स्मार्ट शहरांच्या प्रवासासाठी आव्हाने आणि उपाय शोधणे व व्यापार वाढीसाठी सरकारी, खाजगी क्षेत्र आणि व्यावसायिक यांची एकत्रित चर्चा होण्याकरीता या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशासन, अधिकाऱ्यांना प्रोत्साहन... "लोकप्रिय लीडरशिप अवॉर्ड" या क्षेणीत तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांना "स्मार्ट आणि सक्सेसफुल एसपीव्ही सीईओ ऑफ द इयर" हा पुरस्कार मिळाला. ऑनलाइन मतदानाच्या आधारित हा पुरस्कार देण्यात आला. तसेच, शहराच्या प्रगतीमध्ये नागरिकांच्या सहभागाच्या क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या आणि विकसित केलेल्या सर्वात नाविन्यपूर्ण आणि यशस्वी प्रकल्पासाठी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीच्या "स्मार्ट सारथी सिटीझन इंगेजमेंट" या प्रकल्पाला "स्मार्ट आणि यशस्वी नागरिक सहभाग" पुरस्कार प्राप्त झाला.

### पायाभूत सुविधा क्रांतीला मदत...

**सदर प्रदर्शनामध्ये, ५० हून अधिक वक्ते ५०० हून अधिक अधिकारी, राष्ट्रीय तज्ञ, जागतिक कंपन्या, धोरणकर्ते, वित्त पुरवठादार, तंत्रज्ञ, व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, आर्किटेक्ट, विकासक, नगर नियोजक आणि नागरिक संस्थांनी सहभाग घेतला होता. स्मार्ट सिटी विकसित जागतिक रणनीतींसाठी शहरांना पुरस्कार, त्यांच्या नागरिकांसाठी प्रकल्प, उपक्रम आणि धोरण अंमलबजावणी करण्यात येत आहे. स्मार्ट सोल्यूशन्सच्या क्षेत्रातील कामगिरी ओळखण्यासाठी, स्मार्ट सिटीज कौन्सिल इंडियाने भारतातील सर्वाधिक नागरिकांना लाभ देणाऱ्या प्रकल्पांना पुरस्कार दिला. भारताच्या स्मार्ट सिटी मिशनमधून जन्माला आलेल्या या प्रकल्पांमुळे आपल्या देशातील पायाभूत सुविधांच्या वाढीला चालना मिळाली आहे. पायाभूत सुविधा क्रांतीमध्ये देशाला आघाडीवर ठेवले आहे. तंत्रज्ञानाच्या नाविन्यपूर्ण अनुप्रयोगांचे प्रदर्शन आणि नवकल्पना, समस्यांचे निराकरण करण्यासाठी, जोखीम कमी करण्यासाठी, समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि यशासाठी योजना करण्यासाठी नाविन्यतेला प्रोत्साहन देणारे प्रकल्प प्रदर्शित आणि पुरस्कृत करण्यास मदत होणार आहे.**

# विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्मसाठी हलगर्जीपणा नको !

## आमदार अण्णा बनसोडे यांच्या सूचना : डिजिटल वर्ग खोल्यांसाठी 36 लाखांचा निधी

**पिंपरी ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड मनपा शाळा सुरु होऊन जवळपास ३ महिने झालेले आहेत. २०१९-२०, २०२०-२१ या वर्षात कोविडचा प्रदुर्भाव व लॉकडाऊनमुळे शाळा बंद होत्या २०२१-२२ मध्ये शेवटीचे सहा महिने शाळा पूर्ण क्षमतेने सुरु झाल्या, लॉकडाऊन व कोविड काळात विद्यार्थी शाळेत येऊ शकले नाहीत. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी शाळेत आले परंतु विद्यार्थ्यांना मनपाने गणवेश तसेत इतर शैक्षणिक साहित्य वाटप केले नाही. त्यामुळे पिंपरी विधानसभा मतदार संघाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी प्रशासनाला सूचना केली असून, विद्यार्थ्यांच्या युनिफॉर्मसाठी हलगर्जीपणा नको, असा इशारा दिला आहे. जून २०२२ पासून सर्व मनपा शाळा पूर्ण क्षमतेने सुरु करण्यात आल्या आहेत. शाळा सुरु होऊन खूप कालावधी उलटून गेला, तरी मनपा प्रशासनाच्या अनस्थेमुळे विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहिले आहेत. याला सर्वस्व प्रशासन जबाबदार आहे. गणवेश निविदा काढून द्यायचे



की गणवेश खरेदीचे अधिकार शाळा मुख्याधापाकांना द्यायचे या घोळत वेळ निघून चालला आहे आणि त्याचा फटका विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. गणपती उत्सव ३१ तारखेपासून सुरु होत आहे. गणपती विसर्जनापूर्वी जर प्रशासनाने विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले नाही तर मात्र हा विषय गांभीर्याने घेतला जाईल व मनपा प्रशासनाची

तक्रार मंत्रालयात करण्यात येईल असे मत आमदार बनसोडे यांनी व्यक्त केले. महापालिकेच्या १०५ शाळांमधून ४३००० विद्यार्थी तर १८ माध्यमिक शाळा व ४ भाग शाळांमध्ये ८००० विद्यार्थी असे एकूण ५६००० विद्यार्थी मनपा शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. अनेक शाळांच्या इमारती खूप जुन्या व जीर्ण झालेल्या आहेत. या शाळांमधून स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सर्व वर्ग खोल्या डिजिटल केल्या आहेत. या डिजिटल वर्ग खोल्यांमध्ये इंटरनेट सुविधा फक्त नावापुरती दिलेली आहे. माझ्या स्वीय सहाय्यकाने काही शाळामंध्ये भेटी दिलेल्या आहेत. भेटी दिलेल्या शाळांमध्ये डिजिटल वर्ग खोल्यांमध्ये शिक्षक स्वतः मोबाईलच्या HOTSPOT द्वारे इंटरनेट जोडणी करून विद्यार्थ्यांना शिक्षण देताना दिसले. अधिक चौकशी केली असता केवळ वायरिंग केले आहे. इंटरनेट उपलब्ध नसल्याचे कारण शिक्षकांनी दिले. याबाबत मी प्रत्यक्ष भेटी देणार असुन खरा प्रकार काय आहे याची माहिती घेणार असल्याचे आमदार बनसोडे यांनी सांगितले.

> "माझ्या स्थानिक विकास निधीमधून १२ वर्ग खोल्या डिजिटल केल्या असुन यासाठी केवळ ३६ लक्ष निधी खर्च झाला असुन काम पूर्ण झाले आहे. त्याचा शुभारंभ पुढील आठवड्यात करण्यात येईल.मनपा काही शाळांमधून CBSC पॅटर्नच्या शाळा सुरु करण्यासाठी पुढील आठवड्यात नवीन आयुक्तांची भेट घेऊन शहरातील मनपा शाळेचा शैक्षणिक दर्जावाढ होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.
>
> **-अण्णा बनसोडे, आमदार, पिंपरी विधानसभा**

# 'केटीईएस'मध्ये पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी गुजराथी, उपाध्यक्षपदी भोगाडे बिनविरोध

## खेड तालुका एज्युकेशन सोसायटी : कार्यकारिणीच्या बैठकीत निर्णय

**राजगुरुनगर । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित के.टी.ई.एस. इंग्रजी माध्यम विद्यालयामध्ये प्राथमिक विभागाच्या पालक शिक्षक संघाची कार्यकारिणी नुकतीच गठीत करण्यात आली. यामध्ये शाळेमधून अध्यक्षपदी अनिता गुजराथी तर पालकांमधून उपाध्यक्षपदी अश्विनी भोगाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.





या कार्यकारणीच्या निवडीसाठी नुकतीच बैठक पार पडली. शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता गुजराथी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीला शिक्षक, पालक प्रतिनिधी, पर्यवेक्षक आदि उपस्थित होते. कार्यकारणी निवडीची प्रक्रिया यावेळी मुख्याध्यापिका अनिता गुजराथी यांनी उपस्थिताना समजावून दिली. गुजराथी म्हणाल्या पहिली ते सातवी या प्रत्येक तुकडीतून एक शिक्षणप्रेमी, उपक्रमशील व अभ्यासू पालकांची निवड करण्यात आली आहे. तर शाळेचे मुख्याध्यापक हेच पदसिद्ध अध्यक्ष असतात.

> शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या मध्ये सुसंवाद निर्माण होण्यासाठी शासनाच्या नियमानुसार शिक्षक पालक संघाची स्थापना करण्यात आली. या पार्श्वभूमीवर केटीईएस इंग्रजी विद्यालयामध्ये पालक शिक्षक संघाची कार्यकारणी गठित करण्यात आली.पहिली ते सातवी या प्रत्येक तुकडीतून एक शिक्षणप्रेमी, उपक्रमशील व अभ्यासू पालकांची निवड करण्यात आली आहे.
> -- **अनिता गुजराथी,** मुख्याध्यापिका, के.टी.ई.एस.

या बैठकीत पालक प्रतिनिधींचे शाळेच्या वतीने गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या शिक्षक पालक संघाच्या कार्यकारिणी अध्यक्षपदी अनिता गुजराथी, उपाध्यक्षपदी अश्विनी भोगाडे, सचिव सुप्रिया चौधरी, सहसचिव वैशाली कुडेकर, शीला ओसवाल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. कार्यकारिणीमध्ये सदस्यपदी श्वेता सातकर, सीमा गायकवाड, शामल सोनावणे, हेमांगी पाटील, विदुला देशमुख, स्मिता राळे, निलम तोत्रे, नयना होले, सारिका घनवट आदींचा समावेश आहे.

## ॲम्बुलन्स दरवाढीला विरोध
## महापालिका प्रशासनाने निर्णय मागे घ्यावा!
### सामाजिक कार्यकर्त्या किर्तीताई जाधव यांची मागणी

**पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ॲम्बुलन्ससह वैद्यकीय सेवा सुविधा आणि औषधोपचाराकरीता शहरातील मनपाच्या सर्व मोफत आरोग्यसेवा आणि मोफत उपचारामध्ये आता शासन नियमाप्रमाणे दरवाढ रद्द करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या किर्तीताई जाधव यांनी केला आहे. किर्तीताई जाधव म्हणाल्या की, यशवंतराव चव्हाण रुग्णालयासह सर्व रुग्णालये निर्माण करताना कामगार कष्टकरी वर्गाला मोफत उपचार देणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. राज्यशासनाचे कोणतेही योगदान नसताना महापालिकेने शासन दराने दरवाढ करणे अतिशय चुकीचे आहे. शिवानंद चौगुले म्हणाले की, गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी ॲम्बुलन्स सेवा प्रत्येक किलोमीटरला 20 रुपये केल्याने रुग्णांना त्याचा आर्थिक बोजा पडत आहे. यापूर्वी पिंपरी चिंचवड मध्ये सुमारे 110 रुपयात मिळणारी सेवा आता किमान ₹500 ते 1000 रुपये मोजावे लागत आहे. सदर दरवाढ तात्काळ मागे घेऊन पूर्वीचे दर अमलात आणावे अशी मागणी केली आहे.

## अहो आश्चर्यम् पुणेकरांचा नेम नाही!
## बकरी दारात का बांधली? पोलिसात तक्रार

**पुणे ।प्रतिनिधी।**

बकरी दारात बांधली आणि तिच्या आवाजाचा त्रास होत आहे. या कारणावरुन बकरी मालकाने मारहाण केली आहे. हा वाद थेट खडकी पोलिस ठाण्यात गेला आहे. पुण्यात कधी काय होईल याचा काही नेम नाही. बकरी दारात बांधली आणि तिच्या आवाजाचा त्रास होत आहे. या कारणावरुन बकरी मालकाने मारहाण केली आहे. हा वाद थेट खडकी पोलिस ठाण्यात गेला आहे. तक्रारदार आणि अल्पवयीन मुलामध्ये वाद झाला हा वाद टोकाला गेला. त्यानंतर त्याने थेट पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. तक्रारदार आणि अल्पवयीन मुलगा खडकी परिसरात एकमेकांच्या शेजारी राहतात. या प्रकरणी संबधीत अल्पवयीन मुलाविरूध्द अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. याबाबत एका शिवाजीनगर येथील महात्मा गांधी वसाहतीत राहणाऱ्या एका 35 वर्षीय युवकाने खडकी पोलिस ठाण्यात एका अल्पवयीन मुला विरूध्द तक्रार दिली आहे. अल्पवयीन मुलगा तक्रारदाराच्या घराच्या समोर बकरी बांधत होता.

# भूखंड विक्रीला विरोध!

### आमदार जगताप यांची मागणी : 'पीएमआरडीए' निर्णयाला स्थगिती द्या

**पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी (पीसीएनटीडीए) जमिनी दिलेल्या स्थानिक शेतकऱ्यांना साडेबारा टक्के परतावा मिळालेला नसताना त्याच जागा विकून पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) व्यवसाय करणार आहे. त्यासाठी पीएमआरडीएने पूर्वीच्या प्राधिकरणाच्या चिखली, निगडी आणि भोसरीच्या परिसरातील १२ ठिकाणचे भूखंड ई-लिलावाद्वारे विकण्याची नोटीस प्रसिद्ध केली आहे. जोपर्यंत मूळ शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन परतावा मिळत नाही, तोपर्यंत या १२ ठिकाणच्या भूखंड विक्रीला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी आमदार लक्ष्मण जगताप यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, "मागच्या सरकारने पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुणे महानगर विकास प्राधिकरणामध्ये विलीनीकरण केले आहे.



> पीएमआरडीएच्या तुघलकी फर्मानाविरोधात शहरातील नागरिक व वारस हे आंदोलन, आत्मदहन, मोर्चा, उपोषण इत्यादी मार्गाने विरोध करण्याच्या मानसिकतेत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यांच्यावर झालेल्या अन्याय दूर होण्याची गरज आहे. साडेबारा टक्के जमीन परतावा मिळेल म्हणून गेल्या ५० वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. त्यामुळे या शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन परतावा मिळत नाही, तोपर्यंत पीएमआरडीएच्या शहरातील १२ भूखंड विक्रीला स्थगिती देण्यात यावी.
> **-लक्ष्मण जगताप,** आमदार, चिंचवड विधानसभा.

पिंपरी-चिंचवडच्यादृष्टीने हा अन्यायकारक निर्णय झालेला आहे. प्राधिकरणाच्या अंदाजे सातशे कोटींच्या ठेवी व सुमारे दोन हजार हेक्टरपेक्षा जास्त मोकळ्या जमिनींची हजारो कोट्यावधी रुपये किमतीच्या निधीची उद्योगनागरीच्या विकासासाठी आवश्यकता असताना त्याचे पीएमआरडीएमध्ये विलीनीकरण करून एक प्रकारे पिंपरी-चिंचवडकरांची लूट केल्याची भावना उद्योगनगरीतील नागरिकांच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. अशा स्थितीत पीएमआरडीएच्या वतीने पूर्वीच्या प्राधिकरणाच्या मालकीच्या चिखली, निगडी, भोसरी परिसरातील व्यावसायिकदृष्ट्या मोक्याच्या जागेवरील १२ प्रमुख भूखंड आर्थिक हित जोपासत विकासकांना ई-लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमीन ताब्यात घेऊन औद्योगिक क्षेत्रातील नागरिकांना स्वस्त दरात घरकुल उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १९७२ मध्ये प्राधिकरणाची स्थापन करण्यात आली होती. जमिनीच्या मोबदल्यात स्थानिक शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन परतावा देण्याचाही निर्णय झाला होता. परंतु शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन परतावा ५० वर्ष झाले तरीही अद्याप मिळालेले नाही. आता त्याच शेतकऱ्यांच्या जमिनी विकण्यासाठी पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी तुघलकी फर्मान काढलेले आहे. अनेक मोठ्या बिल्डरांना हाताशी धरत आर्थिक संगनमताने व्यावसायिकदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणी असलेले १२ ठिकाणचे भूखंड विक्रीस काढण्यात आले आहेत.

### पिंपरी-चिंचवडसह पुण्यातील कोकणवासीयांनी मानले आभार

# कोकणवासी प्रवाशांच्यामदतीला आ. लांडगे धावले!

## ऐनवेळी बंद केलेली ग्रुप बुकिंग व्यवस्था केली पूर्ववत

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या वल्लभनगर आगारातून कोकणवासीयांसाठी ग्रुप बुकिंग व्यवस्था बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, आमदार महेश लांडगे यांनी आगारप्रमुखांशी चर्चा करुन ही सुविधा पूर्ववत केली. दि.२८ ते ३० ऑगस्टदरम्यान एकूण १२ गाड्या ग्रुप बुकिंगसाठी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे कोकणवासी प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.**



कोकणवासी प्रवाशांची अडचण सोडवण्यासाठी आमदार लांडगे यांनी थेट वल्लभनगर आगाराला भेट दिली. याठिकाणी आगार प्रमुखांशी सकारात्मक चर्चा करुन ग्रुप बुकिंगसाठी गाड्या उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना केली.

यावेळी माजी नगरसेवक शितल उर्फ विजय शिंदे यांच्यासह सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष अजय पाताडे, कोकण प्रवासी संघाचे अध्यक्ष दादा हाटले, सिंधुदुर्ग एकता मित्र मंडळाचे विलास गवस, सचिन फोंडके, रुपेश गवस, महेश देसाई, जयेश भुवड, बाळा गुरव, मिथुन चव्हाण, प्रकाश चव्हाण, प्रदीप पडवळ, रवी देऊळकर, सागर गावडे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. गणेशोत्सवाकरिता दरवर्षी पिंपरी-चिंचवड शहरातून हजारोंच्या संख्येने कोकणवासी आपापल्या गावाला जात असतात. या करिता शहरातील विविध संस्थेच्या माध्यमातून एस.टी. महामंडळाकडून 'ग्रुप बुकिंग'द्वारे गाड्यांचे बुकिंग केली जाते. यावर्षी वल्लभनगर एसटी आजारातून ग्रुप बुकिंगला मान्यता दिली होती. त्याप्रमाणे जवळजवळ ३० गाड्यांकरिता प्रवाशांचे पैसे जमा करून 'ग्रुप बुकिंग' घेण्यात आली. मात्र, ऐनवेळी 'ग्रुप बुकिंग'ला गाड्या देता येणार नाही, असे सांगण्यात आले. परिणामी, कोकणात जाणाऱ्या ग्रुप बुकिंगमधील प्रवाशांची अडचण झाली होती. दरम्यान, शहरातील प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन आगा प्रमुखांना याचा जाब विचारला. मात्र, प्रशासनाकडून उडवाउडवीची उत्तरे मिळू लागली. अखेर काही प्रवाशांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे दाद मागितली.प्रवाशांची अडचण लक्षात घेत आमदार लांडगे यांनी थेट वल्लभनगर आगारात भेट दिली.

> आगार प्रमुख आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. कोकणवासी प्रवाशांना सुविधा देण्यात प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशा सूचना दिल्या. तसेच, गाड्या उपलब्ध करुन देण्याबाबत परिवहन मंत्र्यांकडेही मागणी करु, पण प्रवाशांना वेठीस धरू नका, असे ठामपणे सांगितले आहे.
>
> **-महेश लांडगे,** शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



---

### शॉर्ट न्यूज

#### महानगरपालिका नोकर भरतीमध्ये स्थानिकांना प्राधान्य द्यावे

**पिंपरी । प्रतिनिधी ।**

पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे सरळसेवा ऑनलाइन पद्धतीने मागविण्यात आलेले आहेत. सदर नोकर भरती प्रकिये मध्ये स्थानिक भूमीपुत्रांना प्राधान्य देण्यात यावे. या करिता माजी नगरसेवक संदीप वाघेरे आणि नवनाथ जगताप यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेतली. या विषयी अधिक माहिती देताना संदीप वाघेरे म्हणाले कि, सदर भेटी दरम्यान कोरोना महामारीच्या संकटामुळे पिंपरी चिंचवड शहरातील अनेक लघु उद्योग बंद पडलेले असून त्यामुळे अनेकांचे रोजगार बुडाले आहेत. त्यामुळे शहरातील बेरोजगारांचा आलेख उंचावला आहे. राज्यातून तसेच परराज्यातून अनेक नागरिक रोजगाराच्या निमित्ताने शहरात दाखल होत असतात. उद्योग क्षेत्रामध्ये सुरु असलेल्या मनमानी कारभारामुळे शहरातील भूमिपुत्रांवर आज बेकारीची परिस्थिती ओढवली आहे.

### 'एसएमबीएस' उद्यमशील, उद्योग सखी पुरस्कारांचे वितरण

# महिला सक्षमीकरणासह जपला समृद्धीचा वसा

## समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**"महिला सक्षमीकरणासह उद्योगशील समृद्धी..." या हेतूने कार्यरत असलेल्या समर्थ महिला बहुद्देशीय संस्थेचा प्रथम वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. यापुढील काळात हा वसा आणखी प्रभावीपणे चालवण्याचा संकल्प यावेळी उपस्थित सदस्यांनी केला. पिंपरी, संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे वर्धापन दिन आणि पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



यावेळी संस्थेच्या संस्थापिका राजश्री गागरे, एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईझेसच्या संचालिका मनीषा थोरात-पिसाळ , उद्योजिका पूर्णिमा लूनावत, विद्या माळी, रेशू अगरवाल, नेहा वर्मा, स्नेहल दराडे, डॉ. क्षमा धुमाळ, डॉ. सारिका मेंगडे तसेच संदीप जाधव, चंद्रकांत घुले, संस्थेचे आधारस्तंभ उद्योजक उमेश चव्हाण स्नेहल दराडे आदी उपस्थित होते. संस्थेचा अहवाल वाचन तसेच प्रत्येकी तीन महिलाना 'एसएमबीएस उद्यमशील पुरस्कार' तसेच सहा महिला सदस्यांना एसएमबीएस उद्योग सखी पुरस्काराने गौरविण्यात आले.

चार महिलांना आयकॉन पुरस्काराने, तर आठ महिलांना एसएमबीएस समन्वयकने गौरविण्यात आले. तसेच, गुणवंत महिलांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. एसएसबीएस ही संस्था प्रामुख्याने महिला सक्षमीकरणासाठी नेहमी प्रयत्नशील असते.

संस्थेच्या संस्थापिका राजश्री गागरे यांनी संस्थेची ध्येय उद्दिष्टे सांगितली. मीना आखाडे आणि कुणाल वाघ यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेच्या उपाध्यक्ष माधुरी ताई उंडे आणि सचिव ज्योती सर्जीने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

#### विविध गुणदर्शनामुळे कार्यक्रमात रंगत...

'क्लिओपात्राज ब्युटी अकॅडमी'च्या ४० स्टूडेंट ने या वेळी भारतातील सर्व प्रांतातील वेशभूषा सादरीकरण करून सादरीकरण केले. तसेच, घरकुल येथील दीव्यांग भगिनींचा ही फॅशन शो झाला. सदस्यांचाही पारंपरिक वर्सेस आधुनिक असा फॅशन शो रंगला होता. महिलांचे लेझिम नृत्य, श्री रेणुका माता लेडीज बाउन्सर ग्रुपच्या रेणुका सुपेकर यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. यावेळी जवळपास ४०० सदस्य उपस्थित होते. आत्तपर्यंत संस्थेच्या १ हजार सदस्य नोंदणी झाली आहेत.

#### पुरस्कारार्थींची नावे पुढीलप्रमाणे :

**एसएमबीएस उद्यमशील पुरस्कार :** स्वाती तहसीलदार ,वैशाली कांडलकर, रश्मी देशमुख.

**एसएमबीएस उद्योग सखी पुरस्कार :** रोशनी सोंडकर,रूपाली देशपांडे, प्रियांका यादव ,मानसी जवळेकर , सोनाली पिंगळे, ज्योती सर्जीने.

**एसएमबीएस आयकॉन :** स्नेहल दराडे,सुनीता हुंबरे, स्वप्नात त्रिभुवन, सोनल मलतापूर, उत्तम व्यावसायिक, ज्योती मयेकर, उत्तम ग्राहक, माधुरी उंडे.

**एसएमबीएस समन्वयक :** शोभा फटांगडे, स्वाती कट्टे,संगीता लांडे, गौरी बांधेलकर ,संगीता जोशी, ज्योती टोके.

**रांगोळी स्पर्धा :** प्रथम प्रांजल माझिरे, द्वितीय मीना आखाडे ,तृतीय संध्या लोहार,उत्तेजनार्थ रूपाली शिर्के रूपाली पवार.

**मेहंदी स्पर्धा :** प्रथम नीलम घाडेकर, द्वितीय रेश्मा फासे, तृतीय रूपाली पवार.उत्तेजनार्थ अमरीन शेख प्रीती गायकवाड.

## संपादकीय »

# अजितदादांच्या कामाची नोंद

***अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातलं वेगळं प्रकरण आहे. कामाचा झपाटा काय असतो ते त्यांच्याकडं बघून कळतं. जाहीरपणे कौतुकाचे शब्द त्यांच्या वाट्याला कधी येताना दिसत नाहीत. परंतु काळाच्या पातळीवर काम करणा-या माणसाचे मूल्यमापन होत असते. तशीच एक नोंद कॅगच्या अहवालात घेण्यात आली आहे.***

२०२०-२१ या आर्थिक वर्षात राजकोषीय तूट तीन टक्क्यांहून खाली आणण्यास महाराष्ट्र सरकारला यश आले. राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या खाली म्हणजे २.६९ टक्क्यांवर आली. करोना काळात राजकोषीय तूट कमी करण्यात महाविकास आघाडी सरकारला यश मिळाल्याचे कॅगच्या अहवालात म्हटले आहे. आर्थिक शिस्तीमुळेच हे घडले असून त्याचे श्रेय निःसंशयपणे अर्थमंत्री अजितदादा पवार यांना जाते. सत्ता असो-नसो महाराष्ट्राच्या राजकीय-सामाजिक जीवनात अजितदादांची नेहमीच चर्चा असते. आपल्या कार्यशैलीमुळे ते नेहमी चर्चेत असतात. जनसामान्यांमध्ये त्यांच्याबद्दल कौतुकाची भावना असली तरी प्रसारमाध्यमांमधून मात्र त्यांच्याबद्दलचे नकारात्मक चित्र रंगवण्याचाच शक्य तेवढा प्रयत्न केला जातो. अशा गोष्टींची पर्वा न करता त्यांचा कामाचा धडाका सुरू असतो. करोना काळात अजितदादांनी जे काम केले, त्याची बरोबरी कोणत्याही राज्यातील कुठलाही मंत्री, मुख्यमंत्री करू शकणार नाही. करोना काळात केरळच्या आरोग्यमंत्रिपदी असलेल्या केके शैलजा यांनी केलेल्या कामामुळे त्यांना कोविड रणरागिणी म्हणून ओळखले जाऊ लागले. शैलजा यांच्या कामाचे कौतुक राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर झाले. एखाद्या राज्याच्या मंत्र्याने किती नियोजनबद्ध काम करावे आणि परिस्थिती नीट हाताळावी, याचे उदाहरण म्हणून शैलजा यांच्या कामाकडे पाहिले जात होते. याच कामाच्या बळावर करोनानंतर झालेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत त्या सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून आल्या. परंतु नव्या चेह-यांना संधी देण्याचे धोरण स्वीकारून पक्षाने त्यांना मंत्रिमंडळातही स्थान दिले नाही. त्याबद्दलही त्यांनी तक्रारीचा सूर काढला नाही. आपण जे काम केले ते पक्षाच्या पाठिंब्यामुळेच करू शकल्याचे सांगताना त्यांनी मंत्रिमंडळात संधी न देण्याचा पक्षाचा निर्णयही मान्य केला होता. यामुळेही शैलजा यांच्या नावाची पुन्हा एकदा देशभर चर्चा झाली होती. एकीकडे शैलजा यांनी केलेल्या कामाची देश-विदेशातील प्रसारमाध्यमांनी दखल घेतली असताना अजितदादांनी केलेल्या कामाची मराठी माध्यमांनीही नीट दखल घेतली नाही. कॅगच्या अहवालात त्यांनी आर्थिक शिस्तीसाठी राबवलेल्या उपाययोजनांबद्दल कौतुक करण्यात आले आहे.



## आनंदी सकाळ

# विनम्रपणे, सेवाभावाने लाभ घ्यावा...

अज्ञानी जिवास जीवनाचे सार्थक करून देण्यासाठी अंधारातल्या दीपज्योतीप्रमाणे प्रेरणा द्यावी, हाच समस्त सेवेकऱ्यांना श्रीस्वामी समर्थांचा संदेश आहे. स्तब्ध पाण्यात छोटासा खडा टाकला, की तरंग उठावेत व ते किनाऱ्यापर्यंत येत-येत पुन्हा स्तब्धतेत विलीन व्हावे, तसा श्रीस्वामी समर्थ महाराजांचा देहावतार होता. पाण्यात तरंग सामावलेले असतात; तसेच श्रीस्वामी महाराज भक्तांच्या हृदयात, सेवेकऱ्यांच्या समाजसेवेत, मानवतेत, या जगताच्या चैतन्यात नित्य, अविनाशी रूपाने सामावले आहेत. 'मैं गया नहीं, जिंदा हूँ' या कथनानुसार, ते चिरंतन, निरंजन ब्रह्मस्वरूपात आहेत. त्यांच्याच विभूती बिडकर महाराज, गुळवणी महाराज, वासुदेवानंद सरस्वती, बाबामहाराज सहस्रबुद्धे, शंकर महाराज, साईबाबा, गजानन महाराज, दिगंबरदास महाराज, पिठले महाराज, मोरेदादा इ. रूपांत महाराजच कार्य करीत आहेत. वरील सर्व अवतार त्यांच्या गुरुशक्तीचे सगुण-साकार सद्गुरुरूप आहे.

# सत्याचा शोध की प्रतिशोध ?



## भूमिका



राज्यात नवे सरकार आल्यानंतर आधीच्या ठाकरे सरकारचे बरेच निर्णय फिरले. त्यातील बहुतेक ठाकरे सरकारने त्याही आधीच्या सरकारचे फिरविलेले होते. गंमत म्हणजे, या तीनही सरकारांमध्ये काम केलेले बरेच जण आहेत.

राज्यात नवे सरकार आल्यानंतर आधीच्या ठाकरे सरकारचे बरेच निर्णय फिरले. त्यातील बहुतेक ठाकरे सरकारने त्याही आधीच्या सरकारचे फिरविलेले होते. गंमत म्हणजे, या तीनही सरकारांमध्ये काम केलेले बरेच जण आहेत. विधानसभेत निवडून आलेले चारही प्रमुख पक्ष आणि आता पाच.. विधानसभेच्या एकाच कार्यकाळात सत्तेत असण्याचा हा प्रकार बऱ्याच दशकांनी होतो आहे. कदाचित, शरद पवार यांनी वसंतदादा पाटील यांचे सरकार ७८ मध्ये पाडल्यानंतर प्रथमच होत असावा. असे असूनही या एका पाठोपाठच्या सरकारांची परस्परांबद्दलची कटुता व शत्रुत्वभावना थक्क करणारी आहे. उद्धव ठाकरे यांनी ज्या रीतीने मेट्रोच्या कारशेडची जागा बदलली, जलयुक्त शिवारला निरोप दिला तेही धक्कादायक होते. आता शिंदे-फडणवीस सरकारने एकाच दिवशी अनेक चौकशांची घोषणा करून विरोधकांच्या मागे जो ससेमिरा लावून दिला आहे; तो उद्या बरेच उत्पात घडविल्यावाचून राहणार नाही. ठासून दारूगोळा भरलेल्या एखाद्या तोफेला बत्ती द्यावी, तसे हे सगळे आदेश आहेत. त्यातून काय वाट्टेल ते बाहेर निघू शकते. यातला मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराची महालेखा परीक्षकांकडून म्हणजे कॅगकडून चौकशी करण्याचा निर्णय सगळ्यांत दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. मुंबई महापालिकेत २५ वर्षे शिवसेनेचा एकछत्री अंमल आहे. खरेतर, त्या सत्तेत भाजप आणि शिंदे गट सामील होताच. तरीही, आता निवडणूक तोंडावर आली असताना अशी चौकशी शिवसेनेला महागात पडू शकते. मुंबई महापालिकेचे अवाढव्य बजेट, मोठ्या कामांसाठी दिले जाणारे शेकडो कोटी रुपये, असंख्य संशयास्पद कंत्राटे आणि सर्वपक्षीय नगरसेवकांना खूष करणाऱ्या 'अंडर'स्टँडिग कमिट्या हे काही नवे नाही. मात्र, ही चौकशी केवळ राजकीय मुस्कटदाबीच्या हेतूने होणार असेल तर त्यात मुंबईकरांचा शून्य लाभ आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या चौकशीची घोषणा करताना ज्या प्रकरणांना उजळा दिला; त्यातल्या बहुतेकांचा उल्लेख त्यांनी विरोधी पक्षनेते म्हणून केलेल्या भाषणात होता. 'आम्ही आलो तर हे सगळे काढू,' असा इशारा त्या भाषणातच होता. पडद्यामागच्या घटनाक्रमाचा अंदाज घेतला तर हे भाषण करताना फडणवीस यांना ते सरकार शेवटच्या घटका मोजत आहे, याची स्पष्ट कल्पना असणार. त्यांनी करोना काळातील नवजात कंपन्या आणि त्यांचे कोट्यवधींचे व्यवहार हा जो उल्लेख केला; तो त्यांच्या रडारवर आधीपासून आहे. खोलात गेले तर या चौकशीत राजकीय रंग विसरून परस्परांचे हात हातात घेतल्याची उदाहरणेही सापडतील. तेवढी निष्पक्षता 'कॅग'च्या चौकशीत राहावी.

# उपाशी राबणारे स्वस्तातले घरकामगार

**दिल्लीतील एका प्लेसमेंट एजन्सीच्या तावडीतून दहा अल्पवयीन आदिवासी मुलींना सोडवण्यात आल्याच्या ताज्या बातमीने महानगरातील लोकांना धक्काच बसला असेल; परंतु महानगरांमध्ये विनापरवाना चालवल्या जाणाऱ्या प्लेसमेंट एजन्सीजमुळे निर्माण झालेल्या उपद्रवाचे हे केवळ हिमनगाचे टोक आहे.**

झारखंड, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालमध्ये चांगले जीवन, अधिक पैसा आणि शिक्षणाचे आमिष दाखवून आदिवासी मुलींना जाळ्यात ओढले जाते. या मुली पुढे देशाच्या महानगरांमधल्या श्रीमंत कुटुंबांमध्ये 'कामासाठी' पाठवल्या जातात. ही एक प्रकारची मानवी तस्करीच आहे. दिल्लीत सुटका झालेल्या मुलींपैकी बहुतेकजणी बारा ते पंधरा वयोगटातील होत्या. स्वतंत्र बंगले, गगनचुंबी अपार्टमेंट्स, दुकाने आणि स्पा अशा ठिकाणी त्यांना कामाला लावले जाते. ही नवी जीवनशैली त्यांना भूलवणारी असते. आपल्या आयुष्याचे कल्याण झाले, अशा भावनेने श्रीमंत घरांमध्ये कामाला लागणाऱ्या या मुली पुढे आपोआप शोषणाच्या सापळ्यात अडकत जातात. त्यांच्याकडून अठरा-अठरा तास काम करून घेतले जाते. पुरेसे अन्न, कपडे न देता कित्येक महिने विनावेतन राबवले जाते आणि काही वेळा तर मालकांच्या बलात्कारातून या मुली गर्भवतीही होतात.

नोएडातील एक उदाहरण पाहू. गेल्या सात वर्षांपासून घरकाम करणाऱ्या



सतरा वर्षांच्या मुलीचे लैंगिक शोषण केल्याच्या प्रकरणात एका ८१ वर्षांच्या माणसाला नुकतीच अटक करण्यात आली. 'पोक्सो' कायद्याखाली त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला. २०२० मध्ये उत्तर प्रदेशच्या गोरखपूरमधून असेच एक प्रकरण पुढे आले होते. तेथे सोळा वर्षांच्या मोलकरणीवर मालक सातत्याने बलात्कार करत होता. त्या मुलीला त्याच्यापासून झालेले मूलही त्याने मारून टाकले होते. कित्येक महिने तो तिला वेतनही देत नव्हता. आपल्याला खुल्या बाजारात एखाद्या वस्तूप्रमाणे विकले जात आहे, याची कल्पना या अशिक्षित मुलींना नसते. तुम्हाला आज आहे त्यापेक्षा चांगले जीवन जगता येईल, असे आमिष दाखवून त्यांना घराबाहेर काढले जाते. घराबाहेर काढल्यानंतर त्यांचा 'जगण्याचा नैसर्गिक हक्क' हिरावला जातो, हे त्यांना समजत नाही. पती-पत्नी नोकरी करत असलेल्या चौकोनी कुटुंबात घरकाम करण्यासाठी अशा मुलींची मोठ्या प्रमाणावर गरज असल्याने त्यांची तस्करी करणाऱ्या ठेकेदारांना आयती बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पैसेवाल्या, धनाढ्य कुटुंबांच्या सेवेसाठी अत्यंत स्वस्तात ते या मुलींची सेवा उपलब्ध करून देतात. वाढत्या शहरीकरणाबरोबरच हा प्रश्न वेगाने वाढतो आहे आणि त्या तुलनेत तो सोडवण्यासाठी होणारे प्रयत्न अपुरे आहेत. त्यात वेगवेगळ्या जाती आणि त्यांच्या आधारावर केलं जाणारं सामाजिक विभाजन, असमानता याबद्दल माहिती होती. उदा. 'जाति व्यवस्था के नियमों को कुछ इस तरह से बनाया गया था की तथाकथित अछूत अपने लिए निर्धारित काम से इतर कोई और काम नही कर सकते थे। कुछ समूहों को कचरा और गांव से मृत जानवरों को उठाने के लिए मजबूर किया गया। उन्हे उंची जाती के लोगों के घरों में जाने और गांव के कुए से पानी लेने की इजाजत नही थी।

## ।। अभंगवाणी ।।



पवित्र सोंवळीं ।
एक तीं च भूमंडळीं ॥१॥
ज्यांचा आवडता देव ।
अखंडित प्रेमभाव ॥धृ.॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलीसांचे पथ संचलन



।सांगली ।महाईन्यूज।

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सांगली शहरात पोलीसांनी पथ संचलन केले. तसेच मुख्य बाजारपेठेत दंगल विरोधी पथकाचे प्रात्यक्षिक झाले.पुढील आठवड्यामध्ये गणेशाचे आगमन होत आहे. महापूर आणि करोना संकटामुळे गणेशोत्सव गेली तीन वर्षे साजरा करता आला नाही. यावर्षी निर्बंधमुक्त वातावरणात उत्सव साजरा होत असल्याने गणेश भक्तांमध्ये उत्साह आहे. गणेशाच्या स्वागताची जोरदार तयारी सुरु असून सार्वजनिक मंडळाच्याकडून मंडप उभारणीची कामे सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर उत्सव शांततेत पार पडावा यासाठी शुक्रवारी सायंकाळी उप अधिक्षक अजित टिके यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांचे पथसंचलन झाले. यावेळी गणपती पेठेमध्ये दंगल नियंत्रण पथकाचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

# सांगली : ...सध्या जोमात नसलो तरी बरं चाललं आहे!

### शहाजी बापू पाटील यांचं विधान!

।सांगली ।महाईन्यूज।



सुप्रसिध्द नर्तिका मानसीताईंनी पाटील जोमात आहेत, असे म्हटले असले तरी डोंगार, झाडी समदं ओकेमुळेच बोलावणं येतं. नाहीतर पाटलांना कोण विचारतो? तरीही सध्या जोमात नसलो तरी बरं चाललं आहे.” असे सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी पलूस येथे दहीहंडीवेळी बोलताना सांगितले.

पलूस येथे पृथ्वीसंग्रामच्यावतीने दहीहंडीचे गुरूवारी सायंकाळी आयोजन करण्याात आले होते. या कार्यक्रमास माजी खा. निलेश राणे, संग्रामसिंह देशमुख, संदीप पाटील आदी उपस्थित होते. या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये मानसी नाईक यांच्या नृत्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नाईक यांनी डोंगार, झाडी, समदं ओके या वक्तव्यामुळे आमदार पाटील जोमात असल्याचे सांगितले. हाच धागा पकडून आमदार पाटील म्हणाले की, “ डोंगार, झाडी यामुळेच ठिकठिकाणी कार्यक्रमासाठी बोलावणं येते. अन्यथा पाटलांना कोण विचारतो?”

तसेच, “मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे दहीहंडीला खेळाचा दर्जा मिळाला असून नोकरीमध्ये गोविंदांना आरक्षणही जाहीर करण्यात आले आहे.” असेही आमदार पाटील म्हणाले.

यावेळी बोलताना निलेश राणे म्हणाले की, “डोंगार, झाडीमुळे आमदार पाटील यांची सिनेअभिनेता शाहरूख खान इतकी लोकप्रियता महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. बापूंनी कोकणातही यावे, तिथेही झाडी, डोंगर आहेत. राज्यात अडीच वर्षानंतर हिंदू धर्माच्या सणासाठी आमदार पाटील यांच्यासारख्या योद्ध्यांनी करोनाचे संकट घालविले आहे. मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यामुळेच राज्यात उत्सव निर्बंधमुक्त झाले.”

यावेळी मानसी नाईक यांनी ठसकेबाज लावण्या सादर केल्या. यामध्ये पाटील वाड्यावर या... या गाण्याने तर तरूणाई बेभान होउन नाचताना दिसली.

---

### शिंदे सरकारची मोठी घोषणा!

# कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफी!

।मुंबई ।महाईन्यूज।



गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोल माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला असून त्याची अंमलबजावणी शनिवार दि. २७ ऑगस्टपासून करण्यात येणार आहे.

मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग यावरील आणि इतर सार्वजनिक बांधकाम विभागांच्या रस्त्यांवरील टोल नाक्यांवर ही सवलत दि. ११ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर हा शासन निर्णय घेण्यात आला असून यासाठीचे पासेस, स्टिकर्स पोलीस परिवहन विभागाकडे उपलब्ध असल्याचं मुख्यमंत्री कार्यालयाकडून सांगण्यात आलं आहे.

गेल्या महिन्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफीसह अन्य सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते त्यानुसार आज सार्वजनिक बांधकाम विभागाने टोल सवलतीचा शासन निर्णय जाहीर केला आहे.

दिनांक २७ ऑगस्ट ते दिनांक ११ सप्टेंबर या कालावधीत मुंबई - बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग (राम-४८), मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग (रा. म. ६६) यावरील व इतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवरील पथकर नाक्यावर कोकणात जाणाऱ्या गणेशोत्सव भाविकांच्या वाहनांना टोल सवलत देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात म्हटले आहे.

या टोलमाफीसाठी "गणेशोत्सव २०२२, कोकण दर्शन अशा आशयाचे स्टीकर्स स्वरुपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते स्टीकर्स आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधीत प्रादेशिक परिवहन विभाग (आर.टी.ओ.) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आर.टी.ओ. कार्यालयांमध्ये उपलब्ध करुन द्यावेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरीता देखील ग्राह्य धरण्यात येईल. पोलीस व परिवहन विभागाने गणेशोत्सवाच्या काळात पास सुविधा आणि त्यांच्या उपलब्धतेबाबतची माहिती नागरिकांना देण्याच्या देखील सूचना आहेत.

# उद्धव ठाकरेंसाठी अत्यंत वाईट काळ आलाय, शिवसेना हिंदुत्वापासून दूर

## शिवसेना-संभाजी ब्रिगेड युतीवर भाजपाचा टोला!

**दिल्ली महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन संपताच राज्यात एक मोठी घडामोड घडली असून शिवसेनेनं संभाजी ब्रिगेडसोबत युतीची घोषणा केली आहे. शिवसेना आणि संभाजी ब्रिगेड यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये ही घोषणा करण्यात आली आहे. खुद्द उद्धव ठाकरेंनीदेखील या युतीचं स्वागत केलं असून मराठ्यांना असलेल्या दुहीच्या शापालाच आपण गाडून टाकू, असं उद्धव ठाकरे या पत्रकार परिषदेत म्हणाले आहेत. या पार्श्वभूमीवर आता राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटू लागल्या असून त्यावर भाजपाकडून खोचक शब्दांत टीका करण्यात आली आहे.**



### "फडणवीस आणि शिंदे असे बॅट्समन आहेत की.."

"आम्हाला काहीही फरक पडत नाही. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस असे बॅट्समन आहेत की जेव्हा क्रिकेटचा खेळ सुरू होईल, एवढे चौकार आणि षटकार लागणार आहेत की महाविकास आघाडी, संभाजी ब्रिगेड असे सगळे गारद होतील आणि प्रचंड बहुमताने खूप धावा करून आम्ही ही मॅच जिंकू", असं बावनकुळे म्हणाले.

भाजपासोबत युती तोडल्यापासून शिवसेना हिंदुत्वापासून दूर गेल्याचा आरोप केला जात आहे. या पार्श्वभूमीवर आता संभाजी ब्रिगेडसोबत शिवसेनेनं युती केल्यामुळे त्यावरून तर्क-वितर्क लढवले जात आहेत. यासंदर्भात लवकरच दोन्ही पक्षांच्या युतीची पुढील वाटचाल कशी असेल, याबाबत माहिती दिली जाईल, असं उद्धव ठाकरेंनी यावेळी जाहीर केलं. "मी या युतीचं स्वागत यासाठी केलं की आपण सगळेजण शिवप्रेमी आहोत. आपला आजपर्यंतचा इतिहास आहे की मराठ्यांना दुहीचा शाप गाडत आला आहे. आपण एकत्र येऊन एक नवीन इतिहास घडवू. या दुहीच्या शापालाच गाडून टाकू", असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

ठाकरेंसोबत कुणीही युती करायला तयार नाही"

दरम्यान, या घडामोडीवर भाजपाकडून टीका करण्यात आली आहे. "संभाजी ब्रिगेडने २०१९मध्ये ४० जागांवर निवडणूक लढवली. त्यांना ०.०६ टक्के मतं मिळाली. उद्धव ठाकरेंना इतकी कमी मतं मिळवणाऱ्या पार्टनरसोबत युती करावी लागतेय. महाराष्ट्रातील कोणताही पक्ष त्यांच्याशी युती करायला तयार नाही. त्यांच्यासोबतचे मित्र त्यांना सोडून पळून जातील. संभाजी ब्रिगेडसोबत जाऊन काही होणार नाही. ते महाराष्ट्राला आव आणून सांगत आहेत. पण हा काळ त्यांच्यासाठी अत्यंत वाईट आहे", अशा शब्दांत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीकास्त्र सोडलं आहे.

---

# "हिंदवी उत्कर्षासाठी आणि..." ऑडिओ क्लिप जारी करत राज ठाकरेंचं हिंदू जनतेला आवाहन



**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सभासद नोंदणी मोहिमेला सुरुवात झाली आहे. गुरुवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंच्या हस्ते पुण्यातून या मोहिमेला सुरुवात झाली. त्यानंतर आज राज ठाकरे यांनी ऑडियो क्लिप जारी करत महाराष्ट्रातील जनतेला सदस्य होण्यासाठी आवाहन केलं आहे. हिंदवी उत्कर्षासाठी आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत सहभागी व्हा, असं आवाहन राज ठाकरे यांनी ऑडिओ क्लिपच्या माध्यमातून केलं आहे.

संबंधित ऑडिओ क्लिपमध्ये राज ठाकरे म्हणाले की, "माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो... हिंदवी उत्कर्षासाठी आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना कायमच कटिबद्ध आहे. आपलं कार्य अधिक व्यापक करण्यासाठी नव्याने सदस्य नोंदणी सुरू करण्यात आली आहे. माझं तुम्हाला आवाहन आहे की, तुम्ही तर सदस्य व्हायचंच आहे. पण इतरांनाही सदस्य करून घ्यायचं आहे." "सदस्य होण्यासाठी ८८६०३००४०४ या क्रमांकावर मिस्डकॉल द्यायचा आहे. मिस्डकॉल दिल्यानंतर तुमच्या फोनवर एक लिंक येईल, त्यावर क्लिक केल्यास मोबाइल स्क्रिनवर एक फॉर्म दिसेल.तो फॉर्म भरून तुम्हाला सभासद व्हायचं आहे. आपण सगळे मिळून महाराष्ट्राला वैभवशाली शिखरावर घेऊन जाऊ... जगाला हेवा वाटेल, असा महाराष्ट्र घडवू..." असं आवाहन राज ठाकरे यांनी केलं आहे.

---

# गुलाम नबी आझाद स्वतःचा पक्ष करणार स्थापन, काँग्रेस पक्षाचा राजीनामा देताच मोठी घोषणा

## अनेक प्रमुख राजकीय नेत्यांनी काँग्रेसला रामराम ठोकला, काँग्रेस पक्षाला आणखी एक मोठा धक्का

**।नवी दिल्ली। ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

काँग्रेस पक्षाचे माजी ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी नुकताच राजीनामा दिला आहे. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर ते भारतीय जनता पार्टीत प्रवेश करतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. पण या सर्व चर्चांना गुलाम नबी आझाद यांनी तूर्तास पूर्णविराम दिला आहे. आपण जम्मू काश्मीरमध्ये स्वतःचा राजकीय पक्ष काढणार असल्याचं आझाद यांनी जाहीर केलं आहे.



याबाबत अधिक माहिती देताना आझाद यांनी सांगितलं की, "मी जम्मू-काश्मीरला जाणार आहे. मी राज्यात माझा स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन करणार आहे. त्यानंतर संबंधित पक्ष राष्ट्रीय स्तरावर आणण्याबाबत चाचपणी करू." आझाद यांनी शुक्रवारी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला. अलीकडच्या काही महिन्यांत अनेक प्रमुख राजकीय नेत्यांनी काँग्रेसला रामराम ठोकला आहे. त्यामुळे हा काँग्रेस पक्षाला आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे.

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांनी पक्षाला रामराम ठोकला आहे. गुलाम नबी आझाद यांनी पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. पक्षाचं प्राथमिक सदस्यत्वही त्यांनी सोडलं आहे. १६ ऑगस्टला त्यांनी जम्मू काश्मीर काँग्रेस प्रचार समितीच्या प्रमुखपदाचा राजीनामा देत आपल्या नाराजीचे संकेत दिले होते. त्यानंतर अखेर आता त्यांनी राजीनामा देत पक्षाला मोठा धक्का दिला आहे. गुलाम नबी आझाद यांनी अध्यक्षा सोनिया गांधी यांना चार पानांचं पत्र पाठवत राजीनामा देत असल्याचं सांगितलं आहे.

### राहुल गांधींनी प्रसारमाध्यमांसमोर सरकारी अध्यादेश फाडला

राहुल गांधी यांनी राजकारणात प्रवेश केल्यानंतर आणि खासकरुन जानेवारी २०१३ मध्ये त्यांच्यावर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवल्यानंतर याआधी असलेली सल्लागार यंत्रणा पूर्णपणे नष्ट करण्यात आली असा आरोप त्यांनी पत्रात केली आहे. तसंच पक्षाच्या अनुभवी नेत्यांना बाजूला सारुन कोणताही अनुभव नसणारे पक्षाचं कामकाज चालवू लागले असंही ते म्हणाले आहेत. राहुल गांधींनी प्रसारमाध्यमांसमोर सरकारी अध्यादेश फाडला हे फारच बालिशपणाचं होतं अशी टीका करताना २०१४ च्या निवडणुकीत झालेल्या पराभवात याचा मोठा वाटा होता असा दावा त्यांनी केला आहे.

# कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणीचा 'सत्यप्रेम की कथा' 29 जून 2023 रोजी होणार प्रदर्शित

कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी अभिनित नमाह पिक्चर्स, समीर विद्वांस दिग्दर्शित, साजिद नाडियादवालाचा बहुप्रतिक्षित चित्रपट – 'सत्यप्रेम की कथा' 29 जून 2023 रोजी प्रदर्शित होणार आहे. शूटिंगच्या सुरुवातीपासून हा चित्रपट सतत चर्चेत आहे. 'सत्यप्रेम की कथा' ही आगामी संगीतमय प्रेमकथा आहे ज्याची घोषणा झाल्यापासूनच चर्चेचा विषय बनली आहे. या चित्रपटाद्वारे कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी दुसऱ्यांदा एकमेकांसोबत पडद्यावर दिसणार आहेत. कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणीचा आगामी 'सत्यनारायण की कथा' या चित्रपटाचं मागील काही दिवसांपूर्वी नाव बदण्यात आलं. मागच्या वर्षी या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. सोबतच चित्रपचटाच्या नावावरूनही वाद सुरू झाला होता. अनेकांनी या चित्रपटाला हिंदू धर्माविरोधात असल्याचं म्हटलं, त्यानंतर आता निर्मात्यांनी सत्यनारायण की कथा हे नाव बदलून 'सत्यप्रेम की कथा' हे नाव ठेवण्याचा निर्णय घेतला. 'सत्यप्रेम की कथा'देखील एनजीई आणि नमाह पिक्चर्स यांच्यातील मोठ्या सहकार्याचे प्रतीक आहे.



विशेष म्हणजे, किशोर अरोरा आणि दिग्दर्शक समीर विद्वांस यांच्यासह साजिद नाडियाडवाला आणि शरीन मंत्री केडिया यांनी आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांसाठी राष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. सत्यप्रेम की कथा 29 जून 2023 रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

# डान्स इंडिया डान्स'च्या मंचावर मराठमोळ्या आशिष पाटीलची जादू...

चंद्रमुखी चित्रपटातील सर्वाधिक गाजलेलं 'बाई गं' हे गाणं ज्याने नृत्य दिग्दर्शित केलं तो आशिष पाटील सध्या हिंदीतील 'डान्स इंडिया डान्स'च्या मंचावर सहभागी झाला आहे. दररोज नवा जोश आणि नवे सादरीकरण यामुळे आशिषने प्रेक्षकांची माने जिंकली आहेत.



प्रेक्षकच नाही तर परीक्षकहि आशिषवर फिदा आहे. अशाच काही भावनिक क्षणाचे फोटो आशिषने शेअर केले आहेत.

# 'राडा' चित्रपटातून अभिनेत्री योगिता चव्हाण झळकणार मुख्य भूमिकेत

'राडा' सिनेमाचे पोस्टर सध्या सोशल मीडियावर चांगलेच गाजतेय. फुल्ल ऑफ ॲक्शन, कॉमेडी आणि सोबत रोमँटिक सीन्सचा भरणा असलेल्या या 'राडा' सिनेमाचे पोस्टर प्रेक्षकांची वाहवा मिळवत असताना आणखी एक सुखद धक्का प्रेक्षकांना मिळणार आहे, तो म्हणजे छोट्या पडद्यावरील 'जीव माझा गुंतला' या मालिकेत मुख्य भूमिका साकारून आपल्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणारी अभिनेत्री योगिता चव्हाण 'राडा' या सिनेमात मुख्य भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवायला आली आहे.

राम शेट्टी निर्मित 'राडा' या चित्रपटात योगिता मुख्य भूमिकेत दिसणार असून तिचा रावडी आणि मितभाषी असे दोन्ही लूक या चित्रपटात पाहायला मिळणार आहेत. या चित्रपटात योगिताचा लव्हेबल अंदाजही प्रेक्षकांना विशेष भावणार आहे. तर योगिताला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी रमेश व्ही. पारसेवार आणि सुप्रिम गोल्ड प्रस्तुत, सूरज फिल्म अँड एंटरटेनमेंट बॅनरचा आणि सहनिर्माता वैशाली पेद्दावार व पॅड कॉर्प – पडगीलवार कॉर्पोरेशन यांच्या हा भव्यदिव्य 'राडा' या ॲक्शनपट पाहणे नक्कीच रंजक



ठरणार आहे. दिग्दर्शक रितेश सोपान नरवाडे यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन, संवाद आणि स्क्रीनप्ले केले असून चित्रपटाच्या संगीताची

लायगर' चित्रपटाच्या पहिल्या दिवसाची कमाई समोर आली असून या चित्रपटाने अक्षय कुमार आणि आमीर खानच्या चित्रपटांना मागे टाकायला सुरूवात केली आहे.

# 'लायगर' चित्रपटाने केली कोटींची कमाई




टॉलिवूड अभिनेता विजय देवरकोंडाचा बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षीत 'लायगर' चित्रपट प्रदर्शित झाला आहे. प्रेक्षका मागील अनेक दिवसांपासून हा चित्रपट पाहण्यासाठी उत्सुक होते. विजय देवरकोंडा पहिल्यांदाच बॉलिवूडमधील हा पहिला चित्रपट असल्यामुळे विजय देवरकोंडाचे अनेक चाहते चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. या चित्रपटात विजयसोबत अभिनेत्री अनन्या पांडे देखील मुख्य भूमिकेत असणार आहे.

'लायगर' करणार बॉक्स ऑफिसवर कमाल?


'लायगर' चित्रपटाच्या पहिल्या दिवसाची कमाई समोर आली असून या चित्रपटाने अक्षय कुमार आणि आमीर खानच्या चित्रपटांना मागे टाकायला सुरूवात केली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात हा चित्रपट नक्कीच बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. चित्रपटाची पहिल्या दिवसाची कमाई

बॉक्स ऑफिसने दिलेल्या रिपोर्ट्सनुसार, हा चित्रपट प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी एकूण 27 ते 29 कोटींची कमाई करेल. तेलगुमध्ये हा चित्रपट जवळपास 24.5 कोटींची कमाई करू शकेल असा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र लायगर चित्रपटाने हिंदी भाषेत फारशी कमाई केलेली नाही. लायगर ने हिंदी भाषेत 2.50 ची कमाई केली आहे. परंतु ही कमाई लाल सिंह चड्ढा आणि रक्षाबंधन चित्रपटापेक्षा जास्त आहे.

दरम्यान, विजय देवरकोंडा आणि अनन्या पांडेच्या 'लायगर' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज होताच चाहते खूप खूश झाले आहेत. विजयची ॲक्शन पाहून सगळेच त्याचे दिवाने झाले आहेत. 2021 मध्ये या चित्रपटाची शूटिंग पूर्ण झाली होती. हा चित्रपट 25 ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे.

# "मी लिहिलेलं 'माझा आनंद' पुस्तक...." आनंद दिघेंच्या पुण्यतिथीनिमित्त प्रसाद ओकची मोठी घोषणा

मराठी अभिनेता प्रसाद ओक हा नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असतो. अभिनेता प्रसाद ओकची मुख्य भूमिका असलेला 'धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे' चित्रपट सुपरहिट ठरला. या चित्रपटातील गाणी, त्यातील संवाद हे कायमच चर्चेत असतात. काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झालेला या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. अभिनेता प्रसाद ओकने आनंद दिघे यांची भूमिका रुपेरी पडद्यावर हुबेहुब साकारली होती. या भूमिकेनंतर त्याला प्रेक्षकांनी डोक्यावर उचलून धरलं. आनंद दिघे यांची आज २१वी पुण्यतिथी आहे. या पुण्यतिथीनिमित्त प्रसाद ओकने खास पोस्ट केली आहे. यात त्याने आनंद दिघेंच्या जीवनावर एक पुस्तक लिहिल्याचे सांगितले आहे. प्रसाद ओक हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. नुकतंच त्याने इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोत एका पुस्तकाचा फोटो शेअर केला आहे. या पुस्तकावर 'माझा आनंद' असे लिहिण्यात आले आहे.



## शॉर्ट न्यूज »

### सामन्याआधी धोनीच्या आठवणीत विराट झाला भावूक

नवी दिल्ली । महाईन्यूज

टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहली मागील काही सामन्यांमध्ये सातत्याने वाईट खेळी दाखवत असल्याने सोशल मीडियावर अनेकदा ट्रोल झाला होता. आपल्याला आपल्या खेळाचा दर्जा माहित असल्याने या ट्रोलर्सकडे दुर्लक्ष करत आहे असेही कोहलीने एका मुलखातीत सांगितले. कोहलीने नुकताच माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी याच्यासोबतचा एक फोटो आपल्या सोशल मीडियावर पोस्ट केला होता. आपली पार्टनरशिप माझ्यासाठी कायम खास असेल असे म्हणत विराटने भावनिक कॅप्शन दिले होते. हा फोटो सध्या सोशल मीडियावर बराच चर्चेत आहे. कोहलीने २००८ मध्ये धोनीच्या नेतृत्वाखाली भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. २०१४ मध्ये धोनीने निवृत्ती घेतल्यानंतर कोहलीने भारताचे कसोटी कर्णधारपद स्वीकारले. कोहली आणि धोनी ही पार्टनरशिप आजवर नेहमीच गाजली होती.

यंदाचे सामने हे टी 20 स्वरूपात व डबल राउंड रॉबिन फॉरमॅट मध्ये खेळले जाणार

# भारतीय फलंदाजांचा विक्रम यंदाही राहणार कायम?

27 ऑगस्ट पासून संयुक्त अरब अमिरातीमध्ये (यूएई) आशिया चषक सामने होणार सुरु

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।



आशिया चषक म्हणजे भारतीय क्रिकेटप्रेमींसाठी एक पर्वणीच आहे. येत्या २७ ऑगस्ट पासून संयुक्त अरब अमिरातीमध्ये (यूएई) यंदाचे आशिया चषक सामने सुरु होणार आहेत. मालिकेच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २८ ऑगस्टला भारत विरुद्ध पाकिस्तानचा बहुचर्चित व बहुप्रतीक्षित सामना असणार आहे. १९८४ ला सुरु झालेल्या आशिया चषकात सुरुवातीपासून भारताचे वर्चस्व आहे. आजवर तब्बल ७ वेळा भारताने आशिया चषकावर आपले नाव कोरले. इतकंच नाही तर या मालिकेत अनेक भारतीय क्रिकेटपटूंनी वैयक्तिक विक्रम सुद्धा रचले आहेत. भारतीय फलंदाजांनी आशिया चषकात आजवर कायम राखलेला एक विक्रम यंदाही टिकणार का याकडे आता सर्वांचे लक्ष वेधले आहे.

काही दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार २७ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीमध्ये आशिया चषक खेळवला जाणार आहे. यंदाचे सामने हे टी २० स्वरूपात व डबल राउंड रॉबिन फॉरमॅट मध्ये खेळले जाणार आहेत.

आशिया चषकासाठी संघात कोणाला स्थान?

यंदाच्या आशिया चषकासाठी बीसीसीआयने १५ सदस्यीय संघाची निवड केली आहे. निवडलेल्या संघाचे नेतृत्व रोहित शर्माकडे तर केएल राहुलकडे उपकर्णधारपद सोपवण्यात आले आहे. माजी कर्णधार विराट कोहली सुद्धा संघाचा भाग असणार आहे. हार्दिक पंड्या, रविंद्र जडेजा या अष्टपैलू खेळाडूंसह रविचंद्रन अश्विन, युझवेंद्र चहल, रवी बिश्नोई, भुवनेश्वर कुमार, अर्शदीप सिंग, आवेश खान, ऋषभ पंत आणि दिनेश कार्तिक या क्रिएकटपटुंना भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे.

भारतीय संघात यंदा रोहित शर्मा, रवींद्र जडेजा, हार्दिक पंड्या, व माजी कर्णधार विराट कोहली अशी फलंदाजांची मजबूत टीम निवडण्यात

# महाराष्ट्रातील पदक विजेत्या खेळाडूंच्या बक्षिसांच्या रकमेमध्ये मोठी वाढ

जागतिक क्रीडा दिनी होणार वितरण




। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळांडूंना देण्यात येणाऱ्या बक्षिसांच्या रकमेमध्ये राज्य सरकारकडून वाढ करण्यात आली आहे. क्रीडा मंत्री गिरीश महाजन यांनी ही माहिती दिली आहे. सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूंना ५० लाख, रौप्य पदक विजेत्यांना ३० लाख तर कांस्य पदकाची कमाई करणाऱ्या खेळाडूंना आत्ता २० लाखांचं बक्षिस मिळणार आहे. याशिवाय प्रशिक्षकांना देखील तीन लाखांऐवजी १२ लाख देण्यात येणार आहेत. येत्या २९ ऑगस्टला जागतिक क्रीडा दिनाचं औचित्य साधून पदक विजेत्या खेळाडूंना ही बक्षिसाची रक्कम वितरित करण्यात येणार आहे. याआधी राज्य सरकारकडून सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक विजेत्या खेळाडूंना अनुक्रमे साडेबारा लाख, सात लाख आणि पाच लाखांचं बक्षिस जाहीर करण्यात आलं होतं. इंग्लंडच्या बर्मिंगहममध्ये नुकतीच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत एकुण ६१ पदकांसह पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानी आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १४ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यातील सात जणांनी पदकांची कमाई केली आहे. हरियाणाच्या खेळाडूंनी सर्वाधिक २४ पदकं मिळवली आहेत. दिल्ली आणि झारखंडने प्रत्येकी आठ, तेलंगणा सहा, केरळ, तमिळनाडूने अनुक्रमे चार आणि पाच, मणिपूर आणि उत्तराखंडच्या खेळाडूंनी प्रत्येकी तीन पदकं जिंकली आहेत.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही